महाराष्ट्र शासन

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय

## सूचना

या सूचनेद्वारे ग्राहक संरक्षण अधिनियम 2019च्या कलम ८-ब मधील तरतूदीनुसार दि.18/2/2022 च्या अधिसूचनेन्वये नियंत्रक शिधावाटप यांच्या कार्यक्षेत्रातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांसाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याकरीता खालील प्रवर्गातून प्रत्येक जिल्हयासाठी कमीत कमी 28 अशासकीय सदस्यांच्या जागांसाठी व्यक्ती / संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | प्रवर्ग | अशासकीय सदस्यांची संख्या (किमान) | | महिला अशासकीय सदस्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई शहर | मुंबई उपनगर | मुंबई शहर | मुंबई उपनगर |
| 1. | महानगरपालिकेचे सदस्य | 8 | 8 | एकुण किमान 5 महिला आवश्यक. (यापैकी अ.क्र.4 व 5 मध्ये प्रत्येकी 1 महिला आवश्यक) | एकुण किमान 5 महिला आवश्यक. (यापैकी अ.क्र.4 व 5 मध्ये प्रत्येकी 1 महिला आवश्यक) |
| 2. | कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी | 2 | 2 | | |
| 3. | ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | 10 | 10 | | |
| 4. | शाळा/महाविद्यालय यांचे प्रतिनिधी | 2 | 2 | | |
| 5. | वैद्यकीय व्यवसायिकांचे प्रतिनिधी | 2 | 2 | | |
| 6. | व्यापार व उद्योग क्षेत्राचे प्रतिनिधी | 2 | 2 | | |
| 7. | पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी | 2 | 2 | | |
| | **एकूण (किमान)** | 28 | 28 | 5 | 5 |

वरील अशासकीय सदस्य पदांवरील नियुक्ती प्रक्रिया व त्याद्वारे करण्यात येणारी निवड शासन निर्णय क्र.राग्राप-2022/प्र.क्र.19/ग्रासं-2, दिनांक 29 ऑगस्ट, 2022 मधील तरतूदीनुसार करण्यात येईल. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202208291531400606 असा आहे. तसेच या संदर्भातील सविस्तर जाहिरात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या https://controllerofrationing-mumbai.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उक्त शासन निर्णयान्वये विहीत नमुना अर्जात (परिशिष्ट-अ) संपूर्ण माहिती भरुन त्यासोबत परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्राच्या साक्षांकित प्रती जोडून जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 30 **दिवसांच्या** आत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय, रॉयल इन्शुरन्स इमारत, 14, ज.टा.मार्ग, चर्चगेट, मुंबई-400 020 या पत्त्यावर विहित वेळेत प्राप्त होतील या बेताने सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

23/8/2023

**स्थळ : मुंबई**
**दिनांक :**

**नियंत्रक शिधावाटप व संचालक**
**नागरी पुरवठा, मुंबई.**

Scanned with OKEN Scanner